महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५

Email id: mco@punecorporation.org

फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/८३०८
दिनांक : २१ / ०२ /२०२१

# आदेश

विषय:- <u>कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश.</u>

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, , १० फेब्रुवारी २०२१
५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१, दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१
६) मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२१.०२.२०२१ रोजी झालेली बैठक

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे ( मिशन बिगिन अगेन ) संदर्भात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी दि.२१ फेब्रवारी २०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली कोविड-१९ विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे अनुषंगाने पुणे जिल्ह्याचे मा.खासदार, मा.आमदार व अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे.

१. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शैक्षणिक संस्था, प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये यांचे नियमित वर्ग तसेच सर्व खाजगी शिकवणी वर्ग ( Coaching Classes ) दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत पूर्णत: बंद राहतील. तथापि, ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील.

२. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील अभ्यासिका ५०% क्षमतेने सामाजिक अंतर (Social Distancing ) व सॅनिटेशनच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून सुरु राहतील.

३. लग्न समारंभ हे मंगल कार्यालय (खुले अथवा बंदिस्त) येथील आसन क्षमतेच्या ५०% क्षमता किंवा २०० व्यक्ती यापैकी जे कमी असेल तेवढ्या व्यक्तींच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील. तसेच ज्यांचेकडील लग्न समारंभ आहे त्यांनी याकरिता पोलिसांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

४. सर्व हॉटेल, रेस्टॉरंट, बार, फूड कोर्ट, इ.आस्थापना रात्री ११:०० वाजेपर्यंतच सुरु राहतील.

५. पुणे महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/ सेवा वगळता दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ पासून रात्री ११:०० ते सकाळी ०६:०० यावेळेत संचार करणेस प्रतिबंध असेल. मात्र यामधून जीवनावश्यक वस्तूंचा (दुध,भाजीपाला,फळे इ.) पुरवठा करणारे, वृत्त पत्र सेवा व अत्यावश्यक सेवा पुरवणारे आस्थापना / व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना वगळण्यात येत आहे. तसेच ज्या उद्योगांचे शिफ्टमध्ये कामकाज चालते अशा संबंधित आस्थापनेवरील कर्मचाऱ्याना व त्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांना सदर आदेशामधून वगळण्यात येत आहे.

६. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मंगल कार्यालये, हॉल, लॉन्स, सांस्कृतिक सभागृह, नाट्यगृह, चित्रपटगृहे, शॉपिंग मॉल, धार्मिक स्थळे, उद्याने व तत्सम मोठ्या संख्येने लोक एकत्र येवू शकतील अशा प्रकारचे कार्यक्रमाचे ठिकाणी सर्व नागरिकांनी मास्क व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार उपरोक्त नमूद सर्व ठिकाणी नागरिकांची गर्दी होणार नाही याची दक्षता संयोजकांनी घ्यावी. तसेच सामाजिक अंतर (Social Distancing ) व सॅनिटेशनच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

८. पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. २२.०२.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. २१.०२ .२०२१ रोजी दिलेला आहे.

( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित